# भारताचा विकास दर जगाच्या तुलनेत चांगला - अभय फिरोदिया

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** आर्थिक मंदीची स्थिती केवळ भारतामध्येच नाही तर जगभरात आहे. हे ध्यानात घेतले तर भारताचा विकास दर हा जगाच्या तुलनेत चांगला आहे, असे मत ज्येष्ठ उद्योगपती आणि फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभय फिरोदिया यांनी बुधवारी व्यक्त केले. देशातील ऑटोमोबाईल क्षेत्राला चांगले भविष्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

फोर्स मोटर्सतर्फे आयोजित कार्यक्रमात फिरोदिया बोलत होते. सध्या देशातील अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती आणि ऑटोमोबाईल क्षेत्रावर त्याचा झालेला परिणाम यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना फिरोदिया म्हणाले,की देशातील ऑटोमोबाईल क्षेत्राचे भविष्य उज्ज्वल आहे. आर्थिक वाढीबाबत जगातील इतर देशांच्या तुलनेत विचार केला तर भारताचा विकास दर चांगला आहे.

सरकारी धोरणे आणि जाचक नियमांचा फटका ऑटोमोबाईल क्षेत्राला बसत असल्याचे फिरोदिया यांनी या वेळी सांगितले. ते म्हणाले,की ऑटोमोबाईल क्षेत्रातील व्यावसायिकांना पायाभूत सुविधा आणि जाचक नियम या प्रामुख्याने दोन अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आपण सध्या ज्या पायाभूत सुविधा निर्माण करीत आहोत, त्या पंधरा वर्षांपूर्वीच देशात निर्माण व्हायला हव्या होत्या.

## समाजवादाचे भूत उतरणे गरजेचे

आर्थिक क्षेत्राला बळकटी आणण्यासाठी आपल्या देशावर थोपण्यात आलेले समाजवादाचे भूत उतरणे गरजेचे आहे. हे एका रात्रीत होणारे नाही. त्याला कालावधी द्यावा लागेल. सरकार, प्रशासन, उद्योजक आणि शिक्षण क्षेत्राने आम्ही चुकलो हे मान्य करून मूलभूत स्वरूपाचे काम करण्याची आवश्यकता आहे, असे अभय फिरोदिया यांनी सांगितले. आर्थिक सुधारणा करायच्या आहेत हे सरकारला समजते, पण त्यावर मार्गही निघेल, अशी आशा वाटते, असेही ते म्हणाले.

## ... तर हे सरकारही चालेल!

राज्यात तीन पक्षांचे सरकार असले तरी राजकीय विसंवाद बंद केला तर हे सरकार पाच वर्षे चांगले चालेल. राज्यापुढे आर्थिक संकटे जरूर आहेत,पण तीन पक्षांनी राजकीय बाचाबाची बाजूला ठेवून आर्थिक विषयांवर लक्ष केंद्रित करायला हवे. ते काम या सरकारकडून नक्की होईल, असे फिरोदिया म्हणाले.